Research Papers

# आ. जयप्रकाष दांडेगावकर यांचे स्थानिक विकासातील योगदान : एक अभ्यास

Prof.पांडुरंग भिमराव बर्वे
प्रबंधक
बहिर्जी स्मारक महाविद्यालय,
वसमतनगर जि. हिंगोली.

## प्रस्तावना :–

आ. जयप्रकश दांडेगावकर वसमतनगर जि. हिंगोली हे सहकार प्रगतीमधील एक मानदंड म्हणून ओळखले जातात. सहकाराच्या माध्यमातुन शेती, शेतकरी व सामान्य व्यक्ती यांच्या जीवनमानामध्ये बदल घडवून आणण्यासाठी गेल्या 30 वर्शापासून ते अविरत प्रयत्न करत आहेत. ऊस, कापूस, दुध व केळी या माध्यमातून त्यांनी वसमत तालुक्यात धवलक्रांती केली आहे. राज्यशास्त्रातील संशोधक व नवनेतृत्वासाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. त्यांनी स्थानिक पातळीवर केलेल्या कार्याचा आढावा यामधून घेण्यात आला आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात लोकशाहीचा स्वीकार करण्यात आला. लोकशाहीमध्ये निवडणुका आल्या, मतदान आले, सामान्य माणसाला मतदानाचा अधिकार आला. त्यामुळे संख्येने जास्त असणाऱ्या व शेती व्यवसाय असणाऱ्या अशा जाती–गटातून राजकीय नेतृत्व उदयाला येऊ लागले. ज्या सामान्य व्यक्तीच्या अंगी नेतृत्वाचे गुण आहेत, अशा व्यक्तींना नेतृत्वाची संधी मिळू लागली. महाराश्ट्रात पंचायत राज संस्था व सहकारी सोसायटया यांच्या माध्यमातून नवीन नेतृत्व उदयाला येऊ लागले. महाराश्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री व आ. जयप्रकाश दांडेगावकर हे अशाच प्रकारे सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून उदयाला आलेले एक ग्रामीण नेतृत्व आहे.

***अभ्यास विशयाचे स्वरूप :***

आ. जयप्रकाश दांडेगावकर यांनी पूर्णा सहकारी साखर कारखाना लि. वसमतनगर जि. हिंगोली व वसमत विधानसभा सदस्य या पदावरून 'वसमतनगर जि. हिंगोली' येथे केलेल्या स्थानिक विकासाचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे.

***अभ्यास विशयाचे महत्व :***

आ. जयप्रकाश दांडेगावकर हे ग्रामीण नेतृत्व सहकारी संस्थेच्या माध्यमातून उदयास आलेले नेतृत्व आहे. अशा नेतृत्वाचा अभ्यास समाजापुढे मांडल्यास, आपल्यामधूनच एक माणुस पुढे येतो, विविध पदावर राहून आपल्या भागासाठी व समाजासाठी कार्य करू शकतो, तसे कार्य आपणही करू शकतो, हा उत्साह वाढविणारा अभ्यास होईल अशी आशा आहे.

***अध्ययन पध्दती :***

प्रस्तुत संशोधन हे शास्त्रीय पध्दतीने केले आहे. संशोधनातील निश्कर्श शास्त्रीय आहेत. निश्चित उद्देश प्राप्तीसाठी नियोजनबध्द संशोधन कार्य केले आहे. संशोधनात व्यश्टी अध्ययन पध्दतीचा वापर केला आहे. विश्लेशणात्मक व वर्णनात्मक पध्दतीचा वापर करून संशोधन कार्य केले आहे.

***अध्ययन व्याप्ती :***

आ. जयप्रकाश दांडेगावकर यांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरूवात सन 1983 साली पूर्णा सहकारी साखर कारखाना लि. वसमतनगरच्या माध्यमातून केली. सन 1983 ला निवडुन आल्यानंतर ते उपाध्यक्ष–अध्यक्ष व संचालक अशा विविध पदावर आजपर्यंत सातत्याने राहिले आहेत. सन 2004 च्या विधानसभा निवडणुकीत ते विजयी झाले व महाराश्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळात राज्यमंत्री झाले. त्यानंतर सन 2009 च्या निवडणुकीत ते पुन्हा विजयी झाले. या विविध पदावरून त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा प्रस्तुत संशोधनात घेण्यात आला आहे.

***तथ्य संकलन :***

आ. जयप्रकाश दांडेगावकर, श्री प्रल्हाद राखोंडे, श्री विनोद झंवर यांच्या मुलाखतीमधून तसेच त्यांनी केलेल्या कार्याचे निरीक्षण करून प्राथमिक स्त्रोतांच्या साहयाने तथ्य संकलनाचा प्रयत्न करण्यात आला आहे. पूर्णा सहकारी साखर कारखाना,

Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.XII/Jan; 2012

रोकडेश्वर सहकारी सुतगिरणी इत्यादी संस्थाना भेटी देऊन माहिती मिळवली आहे. कार्यालयीन कागदपत्रे, वार्शिक अहवाल, वर्तमानपत्रे इत्यादी व्दित्तीयक स्त्रोतांच्या माध्यमातून तथ्ये संकलीत करण्यात आलेली आहेत.

*स्थानिक विकासातील योगदान* :

आ. जयप्रकाश दांडेगावकर यांनी सन 1982 पासून पूर्णा सहकारी साखर कारखाना लि. वसमतनगर जि. हिंगोली व वसमत विधानसभा सदस्य या माध्यमातून आपल्या भागाचा मोठया प्रमाणात विकास केला आहे.

***1) पूर्णा सहकारी साखर कारखाना*** : सहकार क्षेत्रामध्ये शेती, शेतकरी व सामान्य व्यक्ती यांच्या जीवनामध्ये बदल घडवून आणण्याची प्रचंड क्षमता आहे, हे आ. जयप्रकाश दांडेगावकर यांनी पूर्णा साखर कारखान्याच्या माध्यमातून गेल्या 30 वर्शात सिध्द केले आहे. पूर्णाने केवळ 'ऊस एके ऊस' असे धोरण न ठेवता खालील मूलभूत उद्योगात यशस्वी वाटचाल केली आहे.

आसवनी प्रकल्प : साखरेच्या मुल्यवृध्दीसाठी उपपदार्थांचे उद्योग सुरू करण्याचे प्रयोग त्यांनी डोळयासमोर ठेवले व ते यशस्वीही केले. आसवनी प्रकल्प उभारणीसाठी राज्यशासनाची परवानगी त्यांनी मिळवली. मळीपासून स्पिरिट निर्मिती करण्यास डिस्टिलरी प्रकल्प कार्यान्वित केला. आज 30 हजार लिटर/दिन इतकी त्याची क्षमता आहे.

***इथेनॉल प्रकल्प :*** कारखान्यामध्ये जे स्पिरिट उत्पादन होते त्यापासून इथेनॉल तयार केल्यास त्यास निश्चित जादा दर मिळून ऊसाची मूल्यवृध्दी होणार असल्याने 20 हजार लिटर प्रतिदिन क्षमता असलेल्या इथेनॉल प्रकल्प उभारण्याचे काम हाती घेतले. सदर प्रकल्पासाठी कुठल्याही प्रकारचे कर्ज न घेता सभासदांकडून प्रकल्पासाठी कपात केलेल्या ठेवीमधून सुमारे दिड कोटी रूपयांचा हा प्रकल्प कार्यान्वित झाला आहे.

पूर्णा–11 भूसंवर्धक : आसवनीपासून वाया जाणाऱ्या स्पेन्टवॉश या प्रेसमडपासून प्रक्रिया करून कंपोस्ट निर्मिती केली. केवळ कंपोस्ट निर्मितीवर समाधान न बाळगता कार्यक्षेत्रात ओलिताखाली येणाऱ्या जमिनीत पोत क्षारांचे प्रमाण वाढल्यामुळे ते भरून काढण्यासाठी व्ही. एस. आय. पुणे व मराठवाडा कृशी विद्यापीठ, परभणी येथील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली 'पूर्णा–11' या भूसंवर्धकाची निर्मिती केली.

***सहवीज निर्मिती*** : महाराश्ट्र शासनाने अपारंपारीक ऊर्जा स्त्रोतापासून विज निर्मितीचे धोरण जाहीर केले. सदर धोरणास अनुसरून 18 मेगावॅट सहविज निर्मिती प्रकल्प हाती घेतला. दि.17 एप्रिल 2008 रोजी राज्य शासनाने सहविज निर्मिती प्रकल्पास मान्यता दिली. 80 कोटी रूपयांचा हा प्रकल्प दि. 11 एप्रिल 2011 रोजी सुरू झाला आहे.

2) रोकडेश्वर सहकारी सुत गिरणी लि. वसमतनगर : आ. जयप्रकाश दांडेगावकर यांनी मागील 17 वर्शापासून अर्धवट बंद पडलेली रोकडेश्वर सहकारी सुत गिरणी सुरू करण्याचा निर्णय घेतला. विविध अडचणीवर मात करत व मार्ग काढत त्यांनी शासनाकडून एप्रिल 2004 मध्ये 4 कोटी 29 लाख रूपयांचे भाग–भांडवल मंजूर करून घेतले. शासनाने पुन्हा डिसेंबर 2007 मध्ये 1 कोटी 15 लाख रूपयांचे भाग–भांडवल दिले. पूर्णा सहकारी साखर कारखानाच्या सभासदांच्या संमतीने बिनपरतीच्या ठेवीवरील व्याजातून 1 कोटी 13 लाख रूपयांचे भागभांडवल मिळाले. तसेच नवीन सभासदांकडून 6 लाखाचे भागभांडवल जमा झाले. आर्थिक प्रश्नावर मात करत सुतगिरणीने 6 हजार 48 चात्याव्दारे प्रत्यक्ष उत्पादन निर्मिती सुरू केली. प्रकल्पात 340 कामगारांना रोजगार उपलब्ध झाला. आज सुतगिरणीत 21 हजार चात्यांव्दारे उत्पादन सुरू आहे.

***3) पूर्णा ग्लोबल टेक्सटाईल पार्क*** : आ. जयप्रकाश दांडेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली उभारल्या जात असलेल्या या प्रकल्पात कापसावर प्रक्रिया करून कापूस ते रेडीमेड गारमेट कपडे तयार केले जाणार आहेत. प्रकल्पाची नोंदणी 31 डिसेंबर 2007 मध्ये करण्यात आली. एकूण 54.07 एकर क्षेत्रफळात साकारल्या जात असलेल्या प्रकल्पाची एकूण किंमत 99.89 कोटी रू. असुन 36.72 कोटीचे अनुदानही मंजुर झाले आहे. केवळ अडीच वर्शात या प्रकल्पाचे 80 टक्के काम पूर्ण झाले आहे. प्रकल्पात सुमारे सात हजार कामगारांना रोजगार उपलब्ध होणार असुन या प्रकल्पाची वार्शिक उलाढाल सुमारे 150 ते 200 कोटी रुपयांपर्यंत असेल. प्रकल्प फेब्रुवारी 2012 मध्ये कार्यान्वित होईल असे दिसते.

4***) दुग्ध व्यवसाय*** : शेतकऱ्यांना पुरक व्यवसाय करता यावा, जेणेकरून त्यांचा आर्थिक विकास होईल या उद्देशाने आ. जयप्रकाश दांडेगावकर यांनी महाराश्ट्र शासन व नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड यांचे सहकार्याने डिसेंबर 2006 मध्ये हा उपक्रम हाती घेतला. आज वसमत विधानसभा मतदार संघात प्रत्येक सर्कलच्या ठिकाणी दूध संकलन केंद्र कार्यान्वित झाले असून दररोज सरासरी 40 हजार लिटर दुध संकलित केले जात असून त्या माध्यमातून दहा लाख रूपये प्रत्येक दिवशी वाटप करण्यात येत आहेत. योजनेत पाच हजार दुध उत्पादक सहभागी झाले आहेत.

5) पूर्णा केळी व फळ प्रक्रिया संस्था, वसमतनगर : वसमत, पूर्णा, नांदेड व परभणी तालुक्यातील शेतीस बारमाही पाण्याची सोय असल्याने या भागातील शेतकऱ्यांचा कल ऊसाच्या बरोबरीने केळी व फळबागाकडे असल्याने या भागात केळीचे मुबलक प्रमाणात उत्पन्न होते. शेती मालावर प्रक्रिया करण्याची कारखानदारी उभारली गेली नसल्याने शेतकऱ्यांना कच्चा माल बाजारात आहे त्या दराने विक्री करावा लागतो. वेळ प्रसंगी आर्थिक नुकसान देखील शेतकऱ्यांना सहन करावे लागते. या दुश्ट चक्रातुन बाहेर पडण्यासाठी त्यांनी शासनाकडून प्रकल्पास मान्यता मिळविली. यासाठी पूर्णा सहकारी साखर कारखान्यामार्फत केळी सुविधा केंद्र उभारणीसाठी, महाराश्ट्र राज्य कृशी पणन मंडळ, पुणे यांना एक हेक्टर जागा खरेदी करून दिलेली आहे. 100 टन/दिन क्षमतेच्या प्रकल्पाची किंमत रू. 35.00 कोटी असून प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून लवकरच प्रकल्पाला सुरूवात होणार आहे.

***6) सामाजिक योगदान :*** केवळ पूर्णा कारखाना व सभासदांचे हित असा संकुचीत विचार न करता कारखान्याच्या माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना त्यांनी मोठया प्रमाणावर प्रोत्साहन दिले आहे. सामाजिक दृश्टीकोनातून कारखान्यावर सार्वजनिक शिवजयंती, गणेश उत्सव साजरा केला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कारखाना परिसरात त्यांनी उभा केला आहे. परिसरातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय व्हावी म्हणून नवोदय विद्यालयास 30 एकर जागा कारखान्यातर्फे नाममात्र भाडेतत्वावर देण्यात आली आहे. रासायनिक खताची टंचाई व शेतकऱ्यांची व्यापाऱ्याकडून होत असलेली लुट थांबविण्यासाठी पूर्णा सहकारी साखर कारखान्यामार्फत रासायनिक खताचे ना नफा ना तोटा तत्वावर वाटप सुरू आहे. कारखान्याच्या माध्यमातून सभासदांना जोडआहेर करण्यात आला आहे.

***7) आमदार निधीतून विविध विकास कामे :*** विधानसभा निवडणुक प्रचार काळात जनतेला दिलेले आश्वासने व त्यांच्या जाणून घेतलेल्या समस्या लक्षात घेऊन लोकहिताच्या दृश्टीने त्यांनी अनेक कामे केले व आपले नेतृत्व सामान्य जनतेच्या हिताचे व लोक विकासाभिमूख असल्याचे दाखवून दिले. वसमत विधानसभा मतदार संघात सर्वात मोठी समस्या रस्ते, पाणी व वीज यांची आहे. हे लक्षात घेऊन त्यांनी मतदार संघातील सर्व गावांचा अभ्यास करून विकास आराखडा तयार केला आहे. त्यानुसार प्राधान्य क्रमाने ते एकाएका समस्येची सोडवणू करून विकासाची वाटचाल करत आहेत.

निश्कर्श : आ. जयप्रकाश दांडेगावकर यांचे स्थानिक/ग्रामीण विकासातील योगदानाचा आढावा घेतांना पुढीलप्रमाणे काही निश्कर्श समोर येतात.

1) वसमत विधानसभेचे आ. जयप्रकाश दांडेगावकर यांचे स्थानिक

विकासातील योगदान महत्वपूर्ण असे आहे.
2) पूर्णा सहकारी साखर कारखाना लि. वसमतनगर मध्ये त्यांनी इथेनॉल, आसवनी, पूर्णा–11 भुसंवर्धक, सहवीज निर्मिती इ. प्रकल्प सुरु केले.
3) पूर्णा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या माध्यमातून रोकडेश्वर सहकारी सुतगिरणी, बाराशिव सहकारी साखर कारखाना, पूर्णा ग्लोबल टेक्सटाईल पार्क सुरू करून उद्योगांची साखळी निर्माण केली.
4) केळी प्रकिया उद्योग, दुग्ध व्यवसायाला चालना दिली.
5) शैक्षणिक दृश्टीकोनातून नवोदय विद्यालयाला 30 एकर जागा मिळवून दिली.
6) आमदार निधीतून रस्ते, पाणी, वीज, सांस्कृतिक सभागृह बांधून लोकांच्या मुलभुत सोई सुविधांवर त्यांनी लक्ष दिलेले दिसते.
7) एकुणच आ. जयप्रकाश दांडेगावकर यांचे नेतृत्व जनतेच्या हिताचे व लोकविकासाभिमुख असल्याचे दिसून येते.

समारोप : प्रस्तुत शोध पत्रीकेत श्री जयप्रकाश दांडेगावकर यांनी केलेल्या स्थानिक विकासातील कार्याचा अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यांनी विविध राजकीय पदावरून केलेला विकास उल्लेखनिय असल्याचे दिसून येते.

***संदर्भ सुची :***

1) वार्शिक अहवाल, (सन 1987,89,91,92,2004–05) पूर्णा सहकारी साखर कारखाला लि. वसमतनगर जि. हिंगोली.
2) मुलाखत – आ. जयप्रकाश दांडेगावकर, आमदार, वसमतनगर जि. हिंगोली
3) मुलाखत – श्री प्रल्हाद राखोंडे, अध्यक्ष, रोकडेश्वर सहकारी सुतगिरणी लि. वसमतनगर जि. हिंगोली
4) मुलाखत – श्री विनोद झंवर, अध्यक्ष, पूर्णा ग्लोबल टेक्सटाईल पार्क लि. वसमतनगर जि. हिंगोली
5) त्रैमासिक, 'उधो–उधो', (मार्च, एप्रिल, मे 2011) पूर्णा साखर विशेशांक, वसमतनगर जि. हिंगोली
6) जिल्हा नियोजन विभाग, आमदार, स्थानिक विकास कार्यक्रम, (सन 2004,05,06,07,08,09)हिंगोली.
7) दै. गावकरी जि. हिंगोली (दि.11 एप्रिल 2011)